**रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात**

**दो षा रो प**

(फौ. प्र. सं., १९७३ चे कलम २११, २१२, २१३)

नि. फौ. ख. क्र.**६४/२०१७** निशाणी क्रमांक **१४/क**

मी, सुभाष ल. फुले, प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा, जिल्हा रायगड तुमच्यावर,

**राजेश रामभाऊ कापरे.**
वय : १९ वर्षे, धंदा : मोलमजूरी.
राहणार : आंबेवाडी, आदिवासी वाडी,
तालुका : रोहा, जिल्हा : रायगड.

**दोषारोप ठेवतो ते खालीलप्रमाणे** :-

पहिले असे की, तुम्ही व विधी संघर्षीत बालक देवेश उर्फ देव्या सुरेश लोखंडे यांनी समान उद्देशाच्या पुरसरणार्थ दिनांक **२७.०५.२०१७**, वार शनिवार रोजी १८:३५ वाजताच्या सुमारास या न्यायालयाचे स्थळसीमेत, मौजे कोलाड गावाच्या हद्दीत वर्दीदार प्रणय दत्ताराम गुरव सावंतवाडी - दिवा पॅसेंजर रेल्वे गाडीने संगमेश्वर ते पनवेल रेल्वे गाडीच्या उजव्या बाजूच्या दरवाज्यात बसून प्रवास करताना त्याच्या हातावर काठीचा फटका मारुन त्याच्या डोक्याला व डाव्या हाताला किरकोळ दुखापत करुन त्याच्या हातातील मोबाईल खाली पाडून जबरी चोरी करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे ***भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ सह वाचनीय कलम ३४*** अन्वये दंडनीय गुन्हा केला.

निशाणी क्रमांक **१४/क** (२) नियमीत फौजदारी खटला क्रमांक **६४/२०१७**
महाराष्ट्र शासन विरूद्ध राजेश रामभाऊ कापरे

दुसरे असे की, तुम्ही व विधी संघर्षीत बालक यांनी वरील तारीख, वार, वेळी व ठिकाणी वर्दीदार सावंतवाडी - दिवा पॅसेंजर रेल्वे गाडीने संगमेश्वर ते पनवेल रेल्वेगाडीच्या उजव्या बाजूच्या दरवाज्यात बसून प्रवास करताना त्याच्या हातावर काठीचा फटका मारुन त्याच्या डोक्याला व डाव्या हाताला किरकोळ दुखापत करुन त्याच्या हातातील मोबाईल खाली पाडून जबरी चोरी करुन इच्छापुर्वक दुखापत करून रेल्वेला अडथळा केला आणि त्याद्वारे ***रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १५०(ई)*** अन्वये दंडनीय गुन्हा केला.

आणि मी याद्वारे तुमच्याविरूद्ध वरील गुन्ह्यांकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

(आरोपीला दोषारोप वाचून व समजावून सांगीतला त्याने गुन्हा केल्याचे नाकारले व संपरीक्षा घेण्याची मागणी केली.)

मोहोर

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम्.एच्.आर.जी. ०००९ - २१२५)**
**प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**ठिकाण : रोहा.**
**दिनांक : १९.०६.२०१८.**